# वास्तुदर्शन

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघाचे मुखपत्र)

Registered PRGI NO - MAHMAR | 2015 | 63869

वर्ष-१३ * मार्च २०२६ * अंक - ९ * पृष्ठ संख्या - २०



राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था (NIPHT) तळेगाव दाभाडे यांच्यातर्फे आयोजित टेरेस गार्डन (गच्चीवरील बागकाम) दोन दिवसीय निवासी प्रशिक्षणासाठी उपस्थित महासंघाचे संचालक श्री. अव्हेलिनो नरोना आणि महाराष्ट्र राज्य सह. गृह संस्था अपार्टमेंट्सचे तज्ज्ञ संचालक ॲड. श्रीप्रसाद परब - दि. १ फेब्रुवारी २०२६



रोहन बिल्डर्स तर्फे आयोजित My Society My Society Valentine या कार्यक्रमात दीप प्रज्वलन करताना डावीकडून महासंघाच्या संचालक ॲड. मृद्गंधा जोशी, सचिव मनीषा कोष्टी, MIT कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्रमुख मा. म.न.पा. आयुक्त नवल किशोर राम आणि रोहन बिल्डर्सचे श्री. संजय लुंकड




रोहन बिल्डर्स तर्फे आयोजित My Society My Society Valentine या कार्यक्रमात महासंघाच्या सचिव व संचालक यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२५



सकाळ ट्रेनिंग मध्ये उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन यांच्या हस्ते अभ्यास टिपणे दिली. उपस्थित प्रशिक्षक, सचिव मनीषा कोष्टी व ॲड. मृद्‌गंधा जोशी.
दि. २० फेब्रुवारी २०२६



सकाळ ट्रेनिंग मध्ये उपस्थित प्रशिक्षणार्थी आणि प्रशिक्षक, कोषाध्यक्ष श्री. चारुहास कुलकर्णी व संचालक श्री. अव्हेलिनो नरोना
दि. २२ फेब्रुवारी २०२६




१५ वे भारतीय छात्र संसद या **MIT WPU** तर्फे आयोजित कार्यक्रमात महासंघाचे संचालक श्री. अव्हेलिनो नरोना यांनी उपस्थित राहून सहकारातील लोकशाही या विषयावर मार्गदर्शन केले.
दि. २१ फेब्रुवारी २०२६

(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघाचे मुखपत्र)

संपादक : **सुहास पटवर्धन,** अध्यक्ष

पत्ता : ३१३ नारायण पेठ, प्रभात प्रेससमोर, पुणे – ४११०३०.

संपादन सहाय्य : **संचालक मंडळ**

**दूरभाष** : **०२०–२४४५४०१०**

**ई–मेल** : **punefed@gmail.com**

**वेबसाईट** : **www.punefed.com**

**यूट्यूब चॅनल** : **Pune District Housing Federation**

**इन्स्टाग्राम** : **instagram.com / maharashtrahousingfederation**

© : 'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित यांचे स्वाधीन

प्रकाशक : **श्री. सुहास केशव पटवर्धन**

मुद्रक : **श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस,** ए–६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. भ्रमणध्वनी : ९८९००७३९४७

## अनुक्रमणिका

| क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे | ४ |
| २. | संपादकीय | ५ |
| ३. | सातारा येथे गृहनिर्माण संस्थांसाठी प्रशिक्षण | ६ |
| ४. | सांडपाणी प्रक्रिया – नियम व मार्गदर्शक तत्त्वे | ७ |
| ५. | शंका समाधान, टेरेस गार्डन कार्यशाळा | ८ |
| ६. | फेब्रुवारी २०२६ मधील महासंघाचे सभासद | १० |
| ७. | राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह | १२ |
| ८. | पर्यावरणपूरक सह. गृह संस्था | १२ |
| ९. | भारतीय छात्र संसद – MIT | १३ |
| १०. | मोफा कायद्यातील, रिअल इस्टेट (नियमन आणि विकास) कायदा २०१६ च्या धर्तीवरील दुरूस्तीचे अवलोकन व त्याचे दूरगामी परिणाम. | १४ |
| ११. | गृहनिर्माण सोसायट्यांसाठी घनकचरा व्यवस्थापनाची नवीन नियमावली | १६ |
| १२. | महासंघ आपल्यासाठी काय करतो?? | १७ |
| १२. | नियमित पान | १८ |

'वास्तुदर्शन' हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित यांचे मालकीचे असून त्यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक श्री. सुहास केशव पटवर्धन यांनी श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस, ए–६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. येथे छापून ३१३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक – **सुहास केशव पटवर्धन,** मुद्रण स्थान : **श्री सिद्धीविनायक एंटरप्राइजेस – ९८९००७३९४७**

***कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.***

**महासंघातर्फे सहकारी संस्थांना नेहमी लागणारे फॉर्म्स, उपविधी, रजिस्टर्स, संस्था नोंदणीचे फॉर्मस् पावती पुस्तके, व्हाऊचर्स यांची योग्य दरात विक्री महासंघाच्या मुख्य कार्यालयातून सकाळी १०.३० ते सायं. ५.३० या वेळेत करण्यात येते.**

१) भाडेकरू सहभागीदारी संस्था पोटनियम– (फ्लॅट टाईप) इंग्रजी व मराठी
२) संस्था नोंदणी फॉर्मस् संच
३) पोटनियम दुरुस्ती फॉर्मस् संच
४) सभासद फॉर्म (इंग्रजी व मराठी)
५) सहसभासद फॉर्म
६) ट्रान्सफर फॉर्म संच
७) फॉर्म 'ओ' (लेखापरीक्षण दुरुस्ती)
८) फॉर्म 'ओ' पुरवणी
९) नॉमिनेशन फॉर्म (इंग्रजी व मराठी)
१०) रोजकीर्द
११) सभासद रजिस्टर नमुना 'आय'
१२) J रजिस्टर
१३) शेअर रजिस्टर
१४) प्रोसिडिंग बुक
१५) पावती पुस्तके
१६) व्हाऊचर पुस्तके
१७) व्यवस्थापन मार्गदर्शिका
१८) वसुली पुस्तिका
१९) निवडणूक पुस्तक
२०) नॉमिनेशन रजिस्टर
२१) मॉर्गेज रजिस्टर

## महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे

- **१. स्कुलशॉपी –** दुकान क्र. ९, कॉर्पोरेशन बिल्डिंग, चैतन्य हॉस्पिटलसमोर, चापेकर चौक, चिंचवड, पुणे – ४११०३३. भ्रमणभाष : ९३२६०५४९०६
- **२. श्री स्टेशनर्स –** रेव्हेन्यू कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे भ्रमणभाष : ९२७३५०५६०४
- **३. निशा कन्सल्टन्सी –** कृतिका अपार्टमेंट, ग्रीन फुड रेस्टॉरंट जवळ, कोथरुड, पुणे ४११०३८. भ्रमणभाष : ९८५०८८८९७९
- **४. सोसायटी प्लस –** बाजीराव रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे–४११०३०. भ्रमणभाष : ९३७००८८९९५
- **५. प्राईड साईन –** वडगाव धायरी, पुणे – ४११०४१. भ्रमणभाष : ९११२१९१६११
- **६. सुकन्या निरगुडे –** एच–४२, एकता सोसायटी, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे – ४११०३८. (शाखा : सासवड, कोडीत) भ्रमणभाष : ९१५६४१४१९१
- **७. मे. एस. जे. खामकर ॲण्ड असोसिएटस् –** मुंढवा घोरपडी रोड, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मागे, मुंढवा, पुणे – ४११०३६. भ्रमणभाष : ९६२५३४३४३४
- **८. स्वाती पवार – समर्थ सर्व्हिसेस –** स.नं. ४३/२, शिवांजली लेन नं. ३, दत्तनगर, आंबेगाव, पुणे – ४११०४६. भ्रमणभाष : ९४०३९७८९४३.
- **९. पी.एल. इंदोरे ॲण्ड असोसिएटस् –** कमलराज दत्तविहार सोसायटी, मोशी, चिखली रोड, मोशी, पुणे – ४१२१०५. भ्रमणभाष : ९७३०७६७५७९
- **१०. द स्टेशनरी आयकॉन –** शॉप नं. ६, तुषार कॉम्प्लेक्स, पेट्रोलपंप समोर, पौड रोड, भुगाव, पुणे – ४१२११५.
- **११. कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, कोंढवा पोलिस स्टेशनमागे, पुणे – ४११०४८. दूरभाष : ०२०–४८६०७७१७
- **१२. सोसायटी स्मार्ट –** इस्टर्न विंग, जय गणेश विश्व, विश्रांतवाडी चौक, पुणे – ४११०१५. भ्रमणभाष : ९९६०८२९९९८
- **१३. शितल जाधव –** हिंजवडी पुणे को. ऑप. हाऊसिंग अलायन्स भ्रमणभाष : ८४८२८७३४४५
- **१४. चैतन्य पुरंदरे –** विश्वगंगा कॉम्प्लेक्स, संतोष हॉलजवळ, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे – ४११०५१. भ्रमणभाष : ९८६०८२०३९०

## पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित

punefed@gmail.com

♦ *संचालक मंडळ* ♦

| | |
|---|---|
| मा. सुहास पटवर्धन, अध्यक्ष | ९४२२००४७०१ |
| मा. सुभाष कर्णिक, उपाध्यक्ष | ९७६६६०६१४६ |
| सौ. मनीषा कोष्टी, सचिव | ९९२२४१९२१६ |
| मा. चारूहास कुलकर्णी, कोषाध्यक्ष | ९५५२५४६६०७ |
| मा. अनिल असगेकर | ९९६०६०८०७३ |
| मा. सुभाष ढवळे | ९४२१०५८२५५ |
| ॲड. मृद्‌गंधा जोशी | ८७६६४३२७६९ |
| मा. जुजर हैदरी | ९३७१०१७४४० |
| मा. शिवाजी उराडे | ९४२३०१५९९६ |
| मा. अजित चौगुले | ७७५७०२१९५३ |
| मा. विलास थोरात | ९८९००५४३५१ |
| ॲड. प्रकाश तोंडारे | ९७६३६०३३८४ |
| मा. समीर रुपदे | ९८५०५६७४७५ |
| मा. मनोहर देशपांडे | ९३७१०७३७२७ |
| मा. राजन प्रसादे | ९६०४२१२४३० |
| मा. संभाजी घुंडरे | ९८८१०७७२९६ |
| मा. संजय सूर्यवंशी | ९६२३९२९८८९ |
| मा. अव्हेलिनो नरोना | ९९७०४७३१८९ |

♦ *तज्ञ संचालक* ♦

ॲड. वसंतराव कर्जतकर

आर्किटेक्ट विश्वास कुलकर्णी

♦ *कार्यकारी संचालक* ♦

कर्नल प्रमोद दहीतुले ९९९९५३७४३२


## संपादकीय

NA टॅक्स सर्वांना माफ करण्यात आल्याचा निर्णय नुकताच जाहीर करण्यात आला. त्याबाबतचे शासकीय परिपत्रक लवकरच येईल. सध्याच्या सर्व सह. गृह संस्था आणि अपार्टमेंटस्‌ची या करातून सुटका झाली आहे. एक घर आणि दोन कर या महासंघाच्या NA टॅक्स विरोधी जनहित याचिकेला यश मिळाले. महासंघातर्फे उच्च न्यायालयात ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सत्या मुळे यांनी संस्थांची बाजू ठामपणे मांडली व त्याला यश मिळालं. अशा प्रकारच्या सामाजिक चळवळीमधून संस्थांमध्ये जागृति निर्माण करणं आणि त्यांना न्याय मिळवून देणं यासाठी महासंघ गेली ५१ वर्षे अखंडीत कार्य करत आहे.

संस्थांचे दैनंदिन प्रश्न, पर्यावरणपूरक उपक्रम, जागेची मालकी, पुनर्विकास अशा सर्व विषयांवर योग्य आणि सकारात्मक मार्गदर्शन माहसंघामार्फत केले जाते. सभासद संस्थांनी याचा वेळोवेळी लाभ घेऊन संस्था अधिक सक्षम व्हावी यासाठी प्रयत्न करावेत. तसेच आपल्या आजूबाजूच्या संस्थांना महासंघाचे सभासदत्व घेण्यास उद्युक्त करावे. ज्यायोगे प्रलंबित प्रश्न मार्गी लागून सर्व संस्था खऱ्या अर्थाने **सहकारी** गृहनिर्माण संस्था होतील.

***नवीन वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा.***

**– मनीषा विजय कोष्टी**

**सचिव**

***


| वास्तुदर्शन मासिक जाहिरात दरपत्रक ✻ GST सह | | | |
|---|---|---|---|
| | ब्लॅक ॲण्ड व्हाईट | सिंगल कलर | फोर कलर |
| १/३ पान | २,३६०/- | - | - |
| अर्धे पान | ३,५४०/- | ४,७२०/- | - |
| पूर्ण पान | ४,७२०/- | ५,९००/- | १७,७००/- |
| पूर्ण दोन पाने | - | - | २३,६००/- |

✻ हे दर प्रत्येक महिन्यासाठी लागू राहतील.

✻ १२ महिन्यांसाठी जाहिरात दिल्यास वरील दरात एक महिन्याची सूट मिळेल.

# सातारा येथे सह. गृह संस्थांसाठी प्रशिक्षण

**म**हाराष्ट्र राज्य सहकारी संघ व जिल्हा सहकारी बोर्ड सातारा यांचे वतीने आणि सहकार खाते सातारा, गृहनिर्माण संस्थाचा संघ सातारा यांचे संयुक्त सहकार्याने जिल्हा सहकारी बोर्ड सातारा यांचे सभागृहात गृहनिर्माण संस्थातील पदाधिकारी, सचिव, संचालक यांचेसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिरात उद्घाटन प्रसंगी जिल्हा उपनिबंधक **मा. श्री संजयकुमार सुद्रिक** यांनी आवाहन केले की गृहनिर्माण संस्थेचे जाळे दिवसेंदिवस वाढत चालले आहे, त्यामुळे गृहनिर्माण संस्था पदाधिकारी, संचालक यांना प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे आणि ते काम संघाच्या वतीने बोर्डामार्फत सुरळीत पार पाडले जात आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष **मा. श्री धनंजय शेडगे,** संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांनी प्रशिक्षणाचे महत्व तसेच माणूस हा समूहात राहणारा घटक आहे, त्यामुळे सहकारी संस्थेत काम करत असताना कायद्याचे पूर्ण ज्ञान नसेल, तर आपल्यासोबत आपल्या परिवारासह संस्थेच्या इतर सभासदांना देखील अनेक समस्या व अडचणीना सामोरे जावे लागते. त्यामुळे आपल्यासह परिवाराचे व सभासदांचे जीवनमान सुसह्य करायचे असेल, तर कायदेशीर सज्ञान असणे आवश्यक आहे. यासाठी अशा प्रकारच्या प्रशिक्षणाची नितांत गरज आहे.

जिल्हा सहकारी बोर्डाचे ज्येष्ठ संचालक **मा. श्री शाहूराज फाळके** यांनी गृहनिर्माण संस्थेत काम करताना ज्या ज्या अडचणी निर्माण होतात त्यावर समाधान शोधण्यासाठी प्रशिक्षणाची नितांत गरज असते, त्यामुळे बोर्डामार्फत ज्या ज्या वेळी प्रशिक्षण शिबिर असेल त्यावेळेस उपस्थित राहून त्याचा लाभ घ्यावा असे सांगितले.

शिबिराचे प्रमुख व्याख्याते महाराष्ट्र राज्य गृह निर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाचे अध्यक्ष **मा. श्री सुहास पटवर्धन** यांनी गृहनिर्माण संस्थेचा मूळ उद्देश सांगून संस्था कशा कामकाज करतात आणि त्यासाठी फेडरेशनचे मार्गदर्शन कसे घ्यावे हे सांगितले. तसेच पुणे जिल्हा सह. गृह संस्था आणि अपार्टमेंटचे अध्यक्ष **मा. श्री समीर रुपदे** यांनी व्यवस्थापन विषयी बोलताना सांगितले की संस्थेच्या कामकाजात व्यवस्थापनाला अनन्य साधारण महत्व आहे. त्यामुळे गृहनिर्माण संस्थेत पदाधिकारी, संचालक व सभासद यांच्यात समन्वय असणे फार गरजेचे आहे. प्रत्येक गोष्ट कायद्यास धरून व संस्थेच्या हिताचे करणे फार महत्त्वाचे आहे.

त्यानंतर पुणे जिल्हा सह. गृह निर्माण संस्था आणि अपार्टमेंटचे संचालक **श्री. अव्हेलिनो नारोना,** यांनी ग्रीन सोसायटी व रेन वॉटर हार्वेस्टिंग या विषयावर सखोल मार्गदर्शन केले त्याचबरोबर झिरो मेंटेनन्स सोसायटी बनविण्यासाठी काय उपाय योजना करावे लागतील ते सांगितले. त्याचबरोबर सिंकिंग फंड, एज्युकेशन फंड असे विविध फंड कसे व किती काढावे व त्याचा वापर कसा करावा हेही सांगितले.

**ॲडव्होकेट श्री. विलास वर्तक** यांनी कन्व्हेयन्स डिड व डिम्ड कन्व्हेयन्स यातील फरक सांगून दोन्हीचे महत्त्व विशद केले. त्याचबरोबर ते करून घेणे किती महत्त्वाचे आहे हे उदाहरणासह स्पष्ट करून दिले. जर विकासक अभिहस्तांतरण करणेस दिरंगाई करत असेल तर डिम्ड कन्व्हेयन्स कसे करावे तेही सांगितले. जेणेकरून संस्थेची मालकी सिद्ध होऊन रीडेव्हलपमेंट करणे सोयीचे होईल. तसेच उपस्थित प्रशिक्षणार्थी यांच्या शंकांचे निरसनही केले.

कर सल्लागार **मा. श्री नागेश साळुंखे** यांनी गृहनिर्माण संस्थांना लागू असलेले इन्कम टॅक्स कायदे तसेच लेखापरीक्षणाचे महत्त्व विशद केले. लेखापरीक्षण करून घेणे हे कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे संस्थेने लेखापरीक्षण योग्य लेखापरीक्षकाकडून मुदतीत करून घेण्यासाठी कोणती पूर्वतयारी करावी हेही सांगितले.

संदीप सोलार चे संचालक **श्री. संदीप जगताप** यांनी सोलरचे फायदे व सोलर बसविण्यासाठी संस्थेने काय काय करावे त्यासाठी किती सबसिडी मिळेल व संस्थेचा किती फायदा होईल याचे सविस्तर मार्गदर्शन केले.

समारोपप्रसंगी **श्री. राहुल देशमुख** सहाय्यक निबंधक, सातारा यांनी गृहनिर्माण संस्थेने कोणते रेकॉर्ड ठेवावेत ते कसे मेंटेन करावे हे सांगितले. तसेच उपस्थित प्रशिक्षणार्थींचे शंकांचे समर्पक निरसन केले.

कार्यक्रमाचे शेवटी उपस्थित प्रशिक्षणार्थींनी आपले मनोगत व्यक्त करताना शिबिर आयोजन केल्याबद्दल जिल्हा सहकारी बोर्डाचे आभार मानले. जिल्हा सहकारी बोर्डाने ज्या प्रकारे प्रशिक्षण शिबिरात सोयी उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल विशेष आभार उपस्थितानी मानले.

प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल उपस्थिताना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. सदर शिबिराचे प्रास्ताविक **श्री. व्ही. जी. शिंदे,** जिल्हा सहकार विकास अधिकारी यांनी केले. सदर प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी जिल्हा सहकार बोर्डाचे कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

**– श्री. नंदकुमार काटे**
अध्यक्ष सातारा जिल्हा गृह महासंघ

***

# सांडपाणी प्रक्रिया – नियम व मार्गदर्शक तत्त्वे

**सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांसाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प** (STP) **संदर्भातील महत्त्वाचे नियम व मार्गदर्शक तत्त्वे**

सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांनी सांडपाणी शुद्धीकरणासाठी कार्यक्षम सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) चालवणे अनिवार्य आहे. या प्रकल्पातून बाहेर पडणारे पाणी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) यांनी ठरवलेल्या निकषांनुसार असणे आवश्यक आहे :

BOD : 10 mg/L पेक्षा कमी

COD : 50 mg/L पेक्षा कमी

TSS : 10 mg/L पेक्षा कमी

नियमित देखभाल (दरवर्षी गाळ काढणे), दुर्गंधी नियंत्रण, तज्ज्ञांच्या माध्यमातून संचालन, तसेच शुद्ध केलेल्या पाण्याचा जास्तीत जास्त पुनर्वापर करणे आवश्यक आहे. अन्यथा दंड, कायदेशीर कारवाई आणि पाणीपुरवठा बंद होण्याची शक्यता असते.

**महत्त्वाचे कायदेशीर व व्यवस्थापन मार्गदर्शक नियम**

१) कायदेशीर पालन व नियमावली

सोसायटीने राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांच्या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

नियमांचे उल्लंघन झाल्यास मोठा दंड, कायदेशीर कारवाई व पर्यावरण परवानग्यांवर परिणाम होऊ शकतो.

२) कार्यरत परवाना (Consent to Operate - CTO)

प्रत्येक सोसायटीने प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कार्यरत परवाना (CTO) घेणे व ठराविक कालावधीनंतर त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

**कार्यक्षमता व गुणवत्ता मानके**

१) शुद्ध पाण्याची गुणवत्ता

STP मधून बाहेर पडणारे पाणी CPCB मानकांनुसार असणे आवश्यक आहे (BOD, COD, TSS मर्यादेत).

२) पाण्याचा अनिवार्य पुनर्वापर

किमान ६०% किंवा त्यापेक्षा अधिक शुद्ध पाणी पुढील कामांसाठी वापरणे आवश्यक आहे:

टॉयलेट फ्लशिंग, बागकाम, वाहन धुणे

३) नियमित तपासणी

पाण्याची गुणवत्ता दरमहा किंवा दर तीन महिन्यांनी प्रयोगशाळेमध्ये तपासणे आवश्यक आहे.

**देखभाल व तांत्रिक आवश्यकता**

१) गाळ काढणे (Desludging)

ठराविक वेळेनुसार गाळ काढणे व त्याची योग्य विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे.

२) संचालन व्यवस्था

१०० KLD पेक्षा जास्त क्षमतेच्या STP साठी प्रशिक्षित व पात्र ऑपरेटर असणे आवश्यक आहे.

३) वार्षिक देखभाल करार (AMC)

अनुभवी व अधिकृत कंपनीसोबत –AMC करणे अत्यंत आवश्यक आहे.

४) यंत्रसामग्रीची तपासणी

एअर ब्लोअर, डिफ्युजर, मोटर्स व इतर यांत्रिक उपकरणांची नियमित तपासणी करणे गरजेचे आहे.

**सुरक्षा व पर्यावरण संरक्षण**

१) दुर्गंधी नियंत्रण

रहिवासी भागात दुर्गंधी होणार नाही यासाठी योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

२) प्रतिबंधित बाबी

पावसाचे पाणी STP मध्ये जाऊ देऊ नये, कारण त्यामुळे जिवाणू नष्ट होऊन प्रक्रिया बिघडू शकते.

नोंद व दस्तऐवजीकरण

सांडपाणी प्रवाह नोंद

रसायन वापराची माहिती

प्रयोगशाळा तपासणी अहवाल

हे सर्व रेकॉर्ड नियमितपणे ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून तपासणीच्या वेळी सादर करता येतील.

**जबाबदारी**

वरील सर्व नियमांचे पालन करणे ही सोसायटीच्या व्यवस्थापन समितीची (Management Committee) मुख्य जबाबदारी आहे. पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि कायदेशीर अडचणी टाळणे यासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**– अभिजीत कुलकर्णी**
(सहकार मित्र)
भ्रमणभाष : ८८८८८७२३४५

***

# शंका–समाधान

**प्रश्न १ : संस्थेने लेखापरिक्षण अहवाल उपनिबंधकांकडे सादर करण्याचा कालावधी किती?**

**उत्तर :** आर्थिक वर्ष संपल्यानंतर संस्थेने लेखापरिक्षण करून घेऊन समितीच्या मान्यतेने ३० सप्टेंबर पूर्वी उपनिबंधक तसेच जिल्हा विशेष लेखा परिक्षक यांच्याकडे अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

**प्रश्न २ : संस्थेने लेखापरिक्षकाची नेमणूक केली नाही तर काय होईल?**

**उत्तर :** संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेत लेखापरिक्षकाची नेमणूक केली नाहीतर उपनिबंधक परंतुकाच्या आदेशाने सहकार पॅनलवरील अन्य लेखापरीक्षकाची नेमणूक करू शकतो.

**प्रश्न ३ : संस्थेचा दोष दुरुस्ती अहवाल निबंधकांकडे केव्हा सादर करावा?**

**उत्तर :** संस्थेच्या लेखापरिक्षण अहवालातील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी समितीने दोष दुरुस्ती अहवाल तयार करून वार्षिक सभेपुढे मांडावा व त्यानंतर ३० दिवसात निबंधकांकडे सादर करावा.

**प्रश्न ४ : संस्थेला रोख खर्च किती करता येतो?**

**उत्तर :** संस्थेला रोख खर्च १५०० रु. हून जास्त करता येत नाही.

**प्रश्न ५ : समिती सदस्य जर संस्थेच्या कामासाठी खर्च करत असतील तर ते मेंटेनन्स रकमेतून वजा करून घ्यावेत का?**

**उत्तर :** नाही. समिती सदस्य जर संस्थेच्या खर्चासाठी खर्च करत असेल तर योग्य बिले, व्हाऊचर करून संस्थेकडून चेकद्वारे परतावा घेऊ शकतो.

**– मनीषा कोष्टी**
सचिव

***

# टेरेस गार्डन – कार्यशाळा

**रा**ष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था तळेगाव दाभाडे यांच्यातर्फे आयोजित टेरेस गार्डन पहिली दोन दिवसीय कार्यशाळा ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२६ या दिवशी घेण्यात आली.

महासंघ नेहमीच पर्यावरण पूरक उपक्रमांना प्राधान्य देतो. शहरातील घरांच्या रचनेनुसार टेरेस गार्डन आवश्यक आहे. याविषयाची सखोल माहिती घेण्यासाठी पुणे जिल्हा सह. गृह. निर्माण महासंघाचे संचालक श्री. अव्हेलिनो नरोना तसेच महाराष्ट्र राज्य सह. गृह महासंघाचे तज्ज्ञ संचालक ॲड. श्री. प्रसाद परब आवर्जून उपस्थित होते.

या कार्यशाळेत सेंद्रिय खतनिर्मिती व औषध फवारणी, पालेभाज्या व फळांची घरगुती लागवड कशी करावी यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच घरगुती ओला कचऱ्यापासून खत फवारणी औषधे तयार करण्याची माहिती प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात आली. तसेच टेरेस गार्डनला प्रत्यक्ष भेट देऊन माहिती देण्यात आली.

महाराष्ट्रातून वेगवेगळ्या भागातून प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन यांनी उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना पर्यावरण पूरक उपक्रम राबवावेत यासाठी प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या.

**– अव्हेलिनो नरोना**
संचालक

***

Anti Corruption Bureau Maharashtra
ACB
ला. प्र. वि.
Our Work is Our Mission

# ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे

सरकारी नोकर किंवा लोकप्रतिनिधी यांनी लाचेची मागणी केल्यास संपर्क करा –

टोल फ्रि क्रमांक – **1064**

दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802
(2) 020 - 26122134

E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in
Mobile App - www.acbmaharashtra.net

कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.

Anti Corruption Bureau Maharashtra
ACB
ला. प्र. वि.
Our Work is Our Mission

# लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.

भ्रष्टाचारासंबंधी ऑनलाईन तक्रार येथे नोंदवा.

कोणत्याही शासकीय कार्यालयात लाचेची मागणी होत असल्यास संपर्क साधा

तर करा फक्त एक फोन **1064** किंवा

**403781064**

दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802 |
(2) 020 - 26122134

E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in


---

# पुणे मनपा सहाय्यक आयुक्त कार्यालय तपशील

पुणे मनपा कार्यक्षेत्रात सर्व क्षेत्रीय कार्यालयात **दर महीन्याच्या शेवटच्या गुरुवारी ११ वाजता** नागरिकांच्या तक्रारीसंदर्भात **मोहल्ला कमिटी बैठक** असते. या बैठकीसाठी मनपाचे रस्ते, पाणी, आरोग्य, विद्युत, मलनिस्सारण विभागाचे अधिकारी उपस्थित असतात.

सहकारी गृह संस्थांच्या सभासद/पदाधिकारी यांनी आपापल्या भागातील क्षेत्रीय कार्यालयातील बैठकीला उपस्थित राहून तक्रारी नोंदवाव्यात व पाठपुरावा करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) ढोले पाटील रोड | – ०२० २५५९७३९४ | ९) सिंहगड रोड | – ०२० २५५०८२०० |
| २) येरवडा – कळस धानोरी | – ०२० २५५०९१०० | १०) कोंढवा–येवलेवाडी | – ०२० २५५०८८०० |
| ३) नगर रोड, वडगाव शेरी | – ०२० २५५०९००० | ११) हडपसर – मुंढवा | – ०२० २५५९७४०० |
| ४) शिवाजीनगर – घोले रोड | – ०२० २५५०१५०० | १२) वानवडी – रामटेकडी | – ०२० २५५९७४०० |
| ५) कोथरुड – बावधन | – ०२० २५५०१६०० | १३) कसबा – विश्रामबागवाडा | – ०२० २५५९७६०० |
| ६) औंध – बाणेर | – ०२० २५५०९७१० | १४) भवानी पेठ | – ०२० २५५०७२०० |
| ७) धनकवडी – सहकारनगर | – ०२० २५५०८९०४ | १५) बिबवेवाडी | – ०२० २५५०८७०० |
| ८) वारजे कर्वेनगर | – ०२० २५५५९७७० | | |

***

**फेब्रुवारी २०२६ मध्ये एकूण ३२ संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घेतले. महासंघ त्यांचे स्वागत करीत आहे.**

१) **महालक्ष्मी बी सी सह. गृह. संस्था, मर्या.,** शिवणे, पुणे ४११०२३.

२) **यशदा स्प्लेंडीड पार्क को–ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी फेडरेशन लिमिटेड,** डूडूळगाव, पुणे ४१२१०५.

३) **कल्चर क्रेस्ट सह. गृह. संस्था, मर्या.,** मोशी, प्राधिकरण, पुणे ४१२१०५.

४) **आनंद सागर सह. गृह. संस्था, मर्या.,** भोसरी, पुणे ४११०२६.

५) **नम्रता सह. गृह. संस्था, मर्या.,** तळेगाव दाभाडे, पुणे ४१०५०६.

६) **यशोदानंदन सह. गृह. संस्था, मर्या.,** विमाननगर, पुणे ४११०१४.

७) **सोनिगरा एस्टिलो ए व बी विंग सह. गृह. संस्था, मर्या.,** ताथवडे, पुणे ४११०३३.

८) **तनिष पार्क ई विंग सह. गृह. संस्था, मर्या.,** चऱ्होली बु., पुणे ४१२१०५.

९) **सुप्रिम सह. गृह. संस्था मर्या.,** बाणेर, पुणे ४११०४५.

१०) **आकाशगंगा सह. गृह. संस्था मर्या.,** जुन्नर, पुणे ४१२४११.

११) **फेडरेशन ऑफ तनिष पार्क सह. गृह. संस्था, मर्या.,** चऱ्होली बु., पुणे ४१२१०५.

१२) **साईदत्त निवास फेज–१ सह. गृह. संस्था, मर्या.,** आंबेगाव खु., पुणे ४११०४६.

१३) **रिजेन्सी ऍस्टरा ए–१, सह. गृह. संस्था, मर्या.,** बाणेर, पुणे ४११०४५.

१४) **मातृछाया सह. गृह. संस्था, मर्या.,** लोणावळा, पुणे ४१०४०१.

१५) **दामोदर हेरीटेज सह. गृह. संस्था, मर्या.,** वडगावशेरी, पुणे ४११०१४.

१६) **किंगस्टन सीरीन फेज–१, सह. गृह. संस्था, मर्या.,** हांडेवाडी, पुणे ४१२३०८.

१७) **सन एक्झॉटिका बी विंग, सह. गृह. संस्था, मर्या.,** येवलेवाडी, पुणे ४११०४८.

१८) **एच अ‍ॅण्ड एम रॉयल बिल्डींग नं. ४, सह. गृह. संस्था, मर्या.,** कोंढवा बु., पुणे ४११०४८.

१९) **आर्यराज एलिगन्स बी विंग सह. गृह. संस्था, मर्या.,** शिवणे, पुणे ४११०२३.

२०) **स्वामी एनक्लेव्ह सह. गृह. संस्था, मर्या.,** पिंपळे निलख, पुणे ४११०२७.

२१) **स्मृती अपार्टमेंट सह. गृह. संस्था, मर्या.,** चिंचवड, पुणे ४११०३३.

२२) **श्री ओंकार सह. गृह. संस्था, मर्या.,** शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

२३) **श्री शिवतेज सह. गृह. संस्था, मर्या.,** कोथरुड, पुणे ४११०३८.

२४) **कुमार मिलेनियम सह. गृह. संस्था, मर्या.,** कोथरुड, पुणे ४११०३८.

२५) **श्री बालाजी हाईटस् सह. गृह. संस्था, मर्या.,** आंबेगाव बु., पुणे ४११०४६.

२६) **सुप्रिम व्हिलॅजिओ फेज १ सह. गृह. संस्था, मर्या.,** सोमाटणे, पुणे ४१०५०६.

२७) **नवरंग प्लाझा सह. गृह. संस्था, मर्या.,** धानोरी, पुणे ४११०१०.

२८) **रिव्हर डेल रेसिडेन्सी विंग सी सह. गृह. संस्था, मर्या.,** कर्वेनगर, पुणे ४११०५२.

२९) **रिव्हर डेल रेसिडेन्सी विंग बी सह. गृह. संस्था, मर्या.,** कर्वेनगर, पुणे ४११०५२.

३०) **रिव्हर डेल रेसिडेन्सी विंग ए सह. गृह. संस्था, मर्या.,** कर्वेनगर, पुणे ४११०५२.

३१) **इंद्रधनु सह. गृह. संस्था, मर्या.,** नवीपेठ, पुणे ४११०३०.

३२) **किस्टोन अल्टुरा सह. गृह. संस्था, मर्या.,** वाकड, पुणे ४११०५७.

***

**महासंघातर्फे सहकारी संस्थांना नेहमी लागणारे फॉर्मस, उपविधी, रजिस्टर्स, संस्था नोंदणीचे फॉर्मस्, पावती पुस्तके, व्हाऊचर्स याची योग्य दरात विक्री महासंघाच्या कार्यालयातून स. १०:३० ते ५:३० या वेळेत करण्यात येते.**

### न्यूजपेपर फॉर इंडिया, नवी दिल्ली यांचे नियमानुसार फॉर्म ४ – वृत्तपत्राच्या मालकीहक्कासंबंधीचे निवेदन

| | | |
|---|---|---|
| १) मासिकाचे नाव | : | वास्तुदर्शन |
| २) प्रकाशन स्थळ (पूर्ण पत्ता) | : | ३१३ नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे– ४११०३०. |
| ३) प्रकाशन काल | : | मासिक |
| ४) मुद्रकाचे नाव | : | **सुहास केशव पटवर्धन** |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | एफ–२/९०४, सक्सेस टॉवर्स, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८. |
| ५) प्रकाशकाचे नाव | : | **सुहास केशव पटवर्धन** |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | एफ–२/९०४, सक्सेस टॉवर्स, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८. |
| ६) संपादक | : | **सुहास केशव पटवर्धन** |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | एफ–२/९०४, सक्सेस टॉवर्स, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८. |
| ७) मुद्रण स्थळ (पूर्ण पत्ता) | : | श्री सिद्धीविनायक एंटरप्राइजेस, ए–६, विजयश्री टॉवर्स, पुणे– ४११०३०. |
| ८) वृत्तपत्राचे मालकी हक्क/ स्वामित्व इ. चे नाव | : | पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित. |
| कार्यालयाचा पत्ता | : | ३१३ नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे– ४११०३०. |

मी सुहास केशव पटवर्धन, घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे.

दिनांक : ०१–०३–२०२६ **नाव : सुहास केशव पटवर्धन**

प्रकाशक


*With Best Compliments From*

# Structural Auditor

## Indrakumar Jagtap

B.E. (Civil), CHARTERED ENGINEER

**Mobile : 9822332510 * Email : indrakumar.jagtap@gmail.com**

**Web : www.structuralauditorpune.com**

**1, Vyankateshwara Society, Inside From Trimurti Hospital,**
**Sinhgad Road, Vadgaon Budruk, Pune 411041.**

# राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह

२०२६ मधील राष्ट्रीय सुरक्षा दिवस (४ मार्च) ची अधिकृत थीम सुरक्षा वाढवण्यासाठी लोकांना सहभागी करून घेणे, शिक्षित करणे आणि सक्षम करणे (Engage, Educate  Empower People to Enhance Safety) ही आहे. ही थीम सुरक्षित कार्यस्थळ आणि दररोजच्या जीवनात सुरक्षिततेसाठी सामूहिक जबाबदारीवर भर देते.

**राष्ट्रीय सुरक्षा दिवस २०२६ – प्रमुख माहिती :**

**थीम (मराठीत):** सुरक्षा वाढवण्यासाठी लोकांना सहभागी करून घेणे, शिक्षित करणे आणि सक्षम करणे (Engage, Educate Empower People to Enhance Safety)

**उद्देश :** कार्यस्थळ, रस्ते आणि घरांमध्ये सुरक्षा संस्कृती निर्माण करणे, अपघात टाळणे आणि प्रशिक्षण व जागृतीद्वारे लोकांचे सक्षमीकरण करणे.

**महत्त्व :** ही थीम सुरक्षितता केवळ नियम नसून ती एक सामूहिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित करते.

सुरक्षितता आणि आरोग्याची प्रतिज्ञा घेऊन या दिवसाचे पालन केले जाते, ज्यामध्ये व्यावसायिक आजार आणि अपघातांना रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घेतली जाते.

***

# पर्यावरण पूरक सह. गृह संस्था

लुंकड ग्रीन लँड २ सोसायटी, पर्यावरण पूरक सोसायटी, सोसायटी मधील ओला कचरा निर्मूलन (कंपोस्ट पिट)

विमान नगर स्थित आमची सोसायटी लुंकड ग्रीन लँड २, मधे २००९ पासून सोसायटीच्या सर्व ५७ फ्लॅटचा रोजचा कचरा वेगळा केला जात आहे. त्यातील ५०% हा रोजचा ओला कचरा आमच्या ज्या त्या दिवसाच्या कंपोस्ट पिटमध्ये, सफाई कर्मचारी पसरवून टाकतो. साधारणपणे दर ६ महिन्यात आमचे सात कंपोस्ट पीट भरले जातात. कंपोस्ट पिट मध्येच तयार झालेले खत सुकण्यासाठी ठेवतो. नंतर सर्व तयार खत पिटमधून बाहेर काढून पूर्णपणे सुकल्यावर चाळून, २५ किलोच्या बॅगमध्ये भरून ठेवतो. हे तयार खत सोसायटीच्या बागेतील झाडांसाठी तसेच सर्व सभासदांच्या घरातील बागेसाठी वापरले जाते. सर्वसाधारणपणे वर्षभरात ८० बॅग खत तयार होते.

उरलेला ५०% सुका कचरा पण वेगळा केला जातो, प्लास्टिक, वर्तमानपत्र, थर्माकोल, काच वगैरे, यातील प्लास्टिक, थर्माकोल, काच वगैरे, वेगवेगळ्या संस्था सोसायटी मधून घेऊन जातात. उरलेला कचरा महानगर पालिकेच्या गाडीमध्ये रोज घेतला जातो. आमच्या सोसायटीमधून रोजच्या तयार कचऱ्याची अशा प्रकारे विल्हेवाट लावली जाते.

या उपक्रमाबद्दल सोसायटी मधील सर्व ५७ सभासदांना त्यांच्या प्रॉपर्टी टॅक्स मध्ये ५% सूट मिळते. गेली ३ वर्षे महानगर पालिका तसेच वॉर्ड ऑफिसतर्फे आमच्या सोसायटीमध्ये स्वच्छ भारत अभियान या उपक्रमाचे निरीक्षक येऊन कंपोस्ट पिटचे निरीक्षण पण करतात. याचा आम्हाला अभिमान आहे.

तसेच सोसायटी मध्ये २००३  पासून Rooftop रेन वॉटर हार्वेस्टिंग उपक्रम राबविण्यात आल्यामुळे सर्व सभासदाना आणखी ५% सूट मिळते. म्हणजे सोसायटीच्या सर्व सभासदांना वार्षिक १०% सूट मिळते. या शिवाय आमची सोसायटी २००३ पासून टँकर मुक्त आहे. त्यामुळेही सर्व सभासदांना आर्थिक फायदा झाला आहे. तसेच भूजलाची पातळी २२५ फुटांवरून आता फक्त १० फुटावर आली आहे. त्यामुळे पाण्याची उपलब्धता पण वाढली आहे.  त्यामुळे आमची सोसायटी ही पर्यावरणपूरक आहे.

पुणे शहरातील बऱ्याच सोसायटीच्या सभासदांनी आमच्या दोन्ही उपक्रमाची माहिती घेऊन त्यांच्या सोसायटीमध्ये सुद्धा असे उपक्रम राबवले आहेत.

अधिक माहितीसाठी आपण सोसायटीचे अध्यक्ष कर्नल शशिकांत दळवी यांना ९८९०५७७३६४ वर संपर्क साधू शकता.

**– लुंकड ग्रीन लँड २ सोसायटी**
विमान नगर, पुणे ४११ ०१४

***

# भारतीय छात्र संसद – MIT

MIT World peace university Kothrud Pune held Bhartiya chhatra sansad. Largest Global Classroom of Future Political Leaders

**INSPIRING YOUTH, STRENGTHENING DEMOCRACY**

**on 21, 22, 23 FEBRUARY 2026 In Pune India. It was**

**3 Day Program on DEMOCRACY | LEADERSHIP | GOVERNANCE | PUBLIC POLICY.**

Bharatiya Chhatra Sansad has built a vibrant youth movement by connecting thousands of young people across the nation with hope and confidence. Politically and socially active students from over 450 universities across all states of Bharat undergo a rigorous selection process conducted independently by their respective colleges. Around 10,000 to 12,000 of them ultimately earn the opportunity to participate in the flagship annual conclave of BCS. These young leaders take part in engaging academic sessions where they discuss and deliberate on a wide range of significant national and global issues. A distinguished array of political leaders, thought leaders, eminent intellectuals, industrial pioneers, and youth icons of national and international prominence — representing diverse walks of life and ideological perspectives — provide them with context, analysis, courage, insight, and perspective, enabling them to dream bigger, see clearer, and speak louder.

The Bharatiya Chhatra Sansad (Indian Student Parliament), is an apolitical platform that strengthens Democracy, Governance and Ethical Leadership. It encourages the educated youth of Bharat to embrace public life and contribute to nation-building. Students get an opportunity to showcase their oratory and leadership skills and engage with prominent public figures from diverse fields. With the participation of students from across the country, BCS is the largest classroom of future political leaders, reaching over 100,000 students in the last 14 edition. It is a Public Policy scholarly engagement 'Audit Program'. It is facilitated by domain experts and practitioners which offers a structured delivery of sessions focusing on democratic values, ethical leadership, governance systems, and policy frameworks. It reviews the relevance, quality, and outcomes of academic inputs delivered by eminent scholars and practitioners, ensuring alignment with institutional objectives and societal needs.

The program also assesses student engagement through debates and discussions on real-life societal challenges such as inequality, governance failures, and public accountability.

By examining participation, critical thinking, and reflective learning, the audit promotes experiential education, civic consciousness, transparency, and continuous academic.

**Mr. Avelino Noronha** Director Pune housing federation delivered session on Democracy to students

***



# मोफा कायद्यातील, रिअल इस्टेट (नियमन आणि विकास) कायदा २०१६ च्या धर्तीवरील दुरूस्तीचे अवलोकन व त्याचे दूरगामी परिणाम.

**१**९६३ चा मोफा (MOFA) कायदा आणि २०१६ चा रेरा (RERA) कायदा यांच्यातील समन्वयाबाबत एक मोठी शंका होती. जर एखादा गृहनिर्माण प्रकल्प (Project) रेरा अंतर्गत नोंदणीकृत असेल, तर त्यातील सदनिका धारकांना जुन्या मोफा कायद्यातील मानीव अभिहस्तांतरण (Deemed Conveyance) या शक्तिशाली तरतुदीचा लाभ घेता येईल का?

२०२५ च्या दुरुस्ती कायद्याने याचे उत्तर होय असे दिले आहे, पण काही विशिष्ट अटींवर.

या दुरुस्तीमुळे मूळ १९६३ च्या कायद्यात नेमके काय बदल झाले आहेत, ते खालीलप्रमाणे आहेत :-

१. कायद्याच्या कार्यक्षेत्रातील बदल (नवीन कलम १-अ) New Section 1A,

जुनी परिस्थितीः पूर्वी मोफा कायदा सर्व मालकी हक्काच्या सदनिकांच्या प्रकल्पांना लागू होता.

२०१६ मध्ये रेरा आल्यावर जमिनीच्या मालकी हक्कासाठी (Conveyance) कोणता कायदा वापरावा, याबद्दल संभ्रम होता.

**दुरुस्तीचा परिणाम** : २०२५ च्या दुरुस्तीने मोफा कायद्यात नवीन कलम १-अ (Section 1A) समाविष्ट केले आहे.

सर्वसाधारण नियम ज्या प्रकल्पांना रेरा कायदा (RERA) लागू आहे, त्यांना आता मोफा कायदा लागू होणार नाही.

महत्त्वाचा अपवाद मात्र, जमिनीचा मालकी हक्क मिळवून देण्यासाठी मोफा मधील सक्षम प्राधिकारी (Competent Authority) आणि त्याच्याशी संबंधित कलमे (कलम ५-अ, ११-अ, १३-ब ते १३-ड) रेरा प्रकल्पांनाही लागू राहतील.

याचा अर्थ असा की, जरी तुमचा प्रकल्प रेरा अंतर्गत येत असला, तरी कन्व्हेयन्स मिळवण्यासाठी तुम्ही मोफाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांची मदत घेऊ शकता.

२. मानीव अभिहस्तांतरण (Deemed Conveyance) साठीचा पूल (नवीन कलम ११-अ) New Section 11A,

**समस्या** : जुन्या मोफा कायद्यानुसार (कलम ११), जर बिल्डरने जमिनीचे हस्तांतरण (Conveyance) केले नाही, तर सोसायटीला सक्षम प्राधिकाऱ्याकडे जाऊन एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण (Unilateral Deemed Conveyance) मिळवता येत होते. परंतु, रेरा प्रकल्पांसाठी अशी थेट एकतर्फी व्यवस्था रेरा कायद्याच्या कलम १७ मध्ये स्पष्ट नव्हती.

**दुरुस्तीचा परिणाम** : या दुरुस्तीने कलम ११-अ (Section 11A) समाविष्ट केले आहे, जो या कायद्याचा आत्मा आहे.

प्रक्रिया जर रेरा नोंदणीकृत प्रकल्पाच्या विकासकाने (Promoter) रेरा कायद्याच्या कलम १७ नुसार वेळेत कन्व्हेयन्स डीड करून दिले नाही, तर सदनिका धारक किंवा त्यांची संस्था (Association of Allottees) आता मोफाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण (Unilateral Deemed Conveyance) मिळवण्यासाठी अर्ज करू शकते.

**पद्धत** : यासाठी मोफा कायद्याच्या कलम ११ (उप-कलम ३,४ आणि ५) मध्ये दिलेली कार्यपद्धतीच वापरली जाईल.

थोडक्यात सांगायचे तर रेरा नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेला आता बिल्डरने सही करण्यास नकार दिल्यास हतबल होण्याची गरज नाही. ते मोफा कायद्यातील डीम्ड कन्व्हेयन्सचे हत्यार वापरू शकतात.

३. पूर्वलक्षी प्रभाव आणि संरक्षण (Validation)

**चिंता :** ज्या रेरा सोसायट्यांनी २०१६ ते २०२५ या काळात मोफा अंतर्गत डीम्ड कन्व्हेयन्स मिळवले आहे, त्यांचे काय? मोफा लागू नव्हता या कारणास्तव ते बेकायदेशीर ठरतील का?

**दुरुस्तीचा परिणाम** : पूर्वलक्षी प्रभाव (Retrospective Effect) हे बदल १ मे २०१६ (ज्या दिवशी रेरा लागू झाला) पासून लागू झाल्याचे मानले जाईल.

वैधता (Validation) दुरुस्ती कायद्याच्या कलम ५ नुसार, यापूर्वी झालेले सर्व मानीव अभिहस्तांतरण, आदेश किंवा सुरू असलेल्या प्रक्रिया पूर्णपणे वैध मानल्या जातील. रेरा प्रकल्पांना मोफा लागू नव्हता या कारणावरून त्यांना न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

**बदलांचा सारांश (तुलनात्मक तक्ता)**

| वैशिष्ट्य | मूळ मोफा कायदा (१९६३) | २०२५ च्या दुरुस्तीनंतर |
|---|---|---|
| लागू होण्याचे क्षेत्र | महाराष्ट्रातील सर्व मालकी हक्काच्या सदनिकांच्या प्रकल्पांना लागू | कलम १-अ : रेरा प्रकल्पांना लागू नाही, फक्त कन्व्हेयन्सच्या उद्देशासाठी अपवाद म्हणून लागू. |
| कन्वेयन्सचे साधन | कलम ११ : सामान्य प्रकल्पांसाठी मानीव अभिहस्तांतरण Deemed Conveyance | कलम ११-अ : आता रेरा प्रकल्पांसाठीही मानीव अभिहस्तांतरणचा स्पष्ट मार्ग उपलब्ध. |

| वैशिष्ट्य | मूळ मोफा कायदा (१९६३) | २०२५ च्या दुरुस्तीनंतर |
|---|---|---|
| सक्षम प्राधिकारी | कलम ५-अ मोफाच्या समस्या सोडवण्यासाठी नियुक्त अधिकारी. | कलम ५-अ अधिकार वाढवले. आता ते कलम ११-अ (रेरा प्रकरणे) देखील हाताळू शकतात. |

निष्कर्ष (Conclusion): ही दुरुस्ती एक अत्यंत धोरणात्मक निर्णय आहे. प्रकल्पाच्या नियमनासाठी (Regulation) जरी रेरा (RERA) हा मुख्य कायदा असला, तरी जमिनीचा मालकी हक्क सक्तीने हस्तांतरित करण्यासाठी लागणारी प्रशासकीय यंत्रणा (सक्षम प्राधिकारी) फक्त मोफाकडेच आहे, हे सरकारने मान्य केले आहे. मोफामध्ये दुरुस्ती करून तो रेरा प्रकल्पांच्या मदतीला धावून येईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु एक बाब यात महत्वाची आहे ती म्हणजे की, मोफा कायद्यातील तरतुदीनुसार संस्थेच्या नोंदणीपासून ४ महिन्याच्या आत हस्तांतरण करणे बंधनकारक होते; परंतु सदरच्या दुरूस्ती अन्वये रेरा प्रकल्पांना आता रेरा कलम १७ मधील तसेच महारेरा नियमांमधील नियम ९ मधील जाचक अटी पुर्ण केल्यानंतरच हस्तांतरण मागण्याचा आधिकार आहे. सदरच्या अटी अश्या आहेत की, जर एका रेखांकनावर एकच सोसायटी असेल तर सदरच्या इमारतीचा भोगवटा प्राप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आत करणे बंधनकारक आहे, तसेच एका रेखांकनावर अनेक इमारती असतील व त्यातील काही इमारतींची सोसायटी झाली असेल तर त्या सोसायटीला पुर्ण झालेल्या इमारतींचे भोगवटा प्राप्त झाल्यास केवळ स्टक्चरचे हस्तांतरण तीन महिन्यांमध्ये करणे बंधनकारक आहे व सदरच्या जमीनीचे हस्तांतरण त्या रेखांकनातील शेवटच्या इमारतीला भोगवटा पत्र प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत करणे बंधनकारक आहे जर यातील तरतुदीचे उल्लघंन झाले तरच मानीव अभिहस्तांतरणासाठीचा अर्ज करता येणार आहे. सदरच्या बदलाचे परीणाम हे भविष्यात मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळू शकतात.

**– ॲड. कणाद लहाने**
(बी.एस.एल. एलएल.एम.)

***

## : महासंघाचे सहकार दरबार :

| अ.क्र. | सहकार दरबारचे नाव | वार | वेळ |
|---|---|---|---|
| १. | **धनकवडी –** रक्षालेखा सोसा., सर्व्हे क्र. ३०, विक्रमनगर, धनकवडी-४३. | पहिला रविवार<br>**श्री. शिवाजी उराडे** | (स. ११ ते १)<br>९४२३०१५९९६ |
| २. | **पिंपळे सौदागर –** गणेश रेसिडेन्सी, लोटस हॉस्पिटल जवळ, पिंपळे सौदागर, पुणे-२७. | पहिला रविवार<br>**श्री. चारुहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| ३. | **चिंचवड –** गोखले वृंदावन सोसा., चाफेकर चौक, चिंचवड, पुणे-३३. | दुसरा गुरुवार<br>**श्री. सुभाष कर्णिक** | (स. ११ ते १)<br>९७६६६०६१४६ |
| ४. | **मुख्य कार्यालय –** ३१३, नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे-३०. | तिसरा शनिवार<br>**ॲड. प्रकाश तोंडारे** | (स. ११ ते १)<br>०२०-२४४५४०१० |
| ५. | **स्वप्नशिल्प –** स्वप्नशिल्प सोसा., वारजे क्षेत्रीय कार्यालयाजवळ, कोथरुड, पुणे-३८. | चौथा शनिवार<br>**श्री. सुभाष ढवळे** | (स. ११ ते १)<br>९४२१०५८२५५ |
| ६. | **तळेगाव दाभाडे –** समाज मंदिर (संस्था कार्यालय), समाज सेवक सह. गृह. संस्था म. (रेव्हेन्यू कॉलनी), चाकण रोड, फिश मार्केटच्या मागे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे-४१०५०७. | चौथा रविवार<br>**ॲड. ज्योत्स्ना जोशी** | (स. ११ ते १)<br>९२६०२०१६५० |
| ७. | **सहकारनगर –** श्रीगजलक्ष्मी सह. गृह संस्था, सर्व्हे क्र. ८२/२अ, सहकारनगर-१, गांधी ट्रेनिंग कॉलेजसमोर, पुणे-०९. | दुसरा शनिवार<br>**श्री. श्रीराम कुंचुर** | (स. ११ ते १)<br>९४२२०१२१५६ |
| ८. | **औंध –** सुरोभी पार्क, ई-६०३, डीएसके आकाशगंगा शेजारी, नागरस रोड | दुसरा रविवार<br>**सौ. प्रीती शिरोडे** | (सायं. ४ ते ६)<br>९२८४५८८६३४ |
| ९. | **कोंढवा – कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८. | चौथा रविवार<br>**श्री. अव्हेलिनो नरोना** | (स. ११ ते १)<br>९९७०४७३१८९ |
| १०. | **सिंहगड रोड –** ट्युलिप सोसायटी, नवशा मारुती जवळ, पुणे - ४११०५१. | पहिला रविवार<br>**श्री. विलास थोरात** | (स. ११ ते १)<br>९८९००५४३५१ |
| ११. | **हिंजवडी –** यशवन सोसायटी, हिंजवडी,VJ एव्हेन्यू जवळ, माण रस्ता | पहिला शनिवार<br>**श्री. चारूहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |

# गृहनिर्माण सोसायट्यांसाठी घनकचरा व्यवस्थापनाची नवीन नियमावली

**पु**णे महानगरपालिकेच्या आकडेवारीनुसार पुणे शहरामध्ये दररोज सुमारे २३ ते २४ लाख किलो घनकचरा निर्माण होतो. देशाच्या पातळीवर पाहिल्यास भारतात दररोज जवळपास १६ कोटी किलोहून अधिक घनकचरा निर्माण होतो. त्यातील मोठा हिस्सा शहरांमधून तयार होतो. इतक्या मोठ्या प्रमाणात तयार होणाऱ्या कचऱ्याचं शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन होण्यासाठी केंद्र सरकारने घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ जाहीर केले होते.

या नियमांद्वारे घनकचरा व्यवस्थापनाची एक चौकट आखून देण्यात आली होती. त्यामध्ये कचऱ्याचं त्याच्या स्रोतावरच वर्गीकरण, स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आणि ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण होतो अशा रहिवासी तसेच व्यावसायिक आस्थापनांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या होत्या.

आता या चौकटीला अधिक मजबूत करत केंद्र सरकारने नवीन घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ जाहीर केले आहेत. हे नियम १ एप्रिल २०२६ पासून संपूर्ण देशात लागू होणार आहेत. या नवीन नियमांमध्ये केवळ कचरा व्यवस्थापनावरच नव्हे, तर त्याच्या प्रभावी अंमलबजावणी आणि डिजिटल ट्रॅकिंगवरही अधिक भर देण्यात आला आहे.

यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि संबंधित मंत्रालयांच्या माध्यमातून डिजिटल पोर्टल तयार करण्यात येणार आहे. या पोर्टलवर घनकचरा व्यवस्थापनासंबंधित माहिती, नोंदणी, अहवाल आणि अनुपालनाची नोंद ठेवली जाणार आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ नुसार हाऊसिंग सोसायट्यांना आणि इतर मोठ्या कचरा निर्मात्यांना कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील, याचीही स्पष्ट रूपरेषा आखून देण्यात आली आहे. नवीन नियमांमुळे कचरा व्यवस्थापनाची संपूर्ण प्रणाली काटेकोरपणे राबवण्याचा प्रयत्न असणार आहे. गृहनिर्माण सोसायट्यांसाठी हे नियम का महत्त्वाचे आहेत हे समजून घेणं आवश्यक आहे.

**बल्क वेस्ट जनरेटर म्हणजे कोण?**

या नियमांमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या घटकांची म्हणजेच 'बल्क वेस्ट जनरेटर' (Bulk Waste Generator) यांची स्पष्ट व्याख्या करण्यात आली आहे.

ज्या इमारतींचे क्षेत्रफळ २० हजार चौरस मीटरपेक्षा अधिक आहे किंवा जिथे दररोज ४० हजार लिटरपेक्षा जास्त पाणी वापरले जाते किंवा जिथून दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण होतो, अशा सर्व ठिकाणांचा यात समावेश होतो. यातील एक जरी निकष पूर्ण झाला तरीही त्या आस्थापनांना बल्क वेस्ट जनरेटर मानण्यात येईल.

यामध्ये पुढील प्रकारच्या संस्थांचा समावेश होऊ शकतो :

* मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या आणि गृहसंकुले
* सरकारी कार्यालये
* स्थानिक स्वराज्य संस्था
* व्यावसायिक इमारती
* विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्था
* वसतिगृहे
* हॉटेल्स, मॉल्स आणि खासगी संस्था

**२०२६ च्या नियमांमध्ये नवीन काय?**

नवीन नियमांमध्ये कचऱ्याचं त्याच्या स्रोतावरच वर्गीकरण करण्याला अधिक महत्त्व देण्यात आले आहे.

२०१६ च्या नियमांनुसार कचऱ्याचे तीन प्रकारांमध्ये वर्गीकरण करावं लागत होतं. आता २०२६ च्या नियमांनुसार चार प्रकारांमध्ये वर्गीकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

हे चार प्रकार पुढीलप्रमाणे आहेत :

**ओला कचरा –** स्वयंपाकघरातील कचरा, फुले इत्यादी

**सुका कचरा –** कागद, प्लास्टिक, धातू, काच इत्यादी

**सॅनिटरी कचरा –** सॅनिटरी नॅपकिन, डायपर, वैयक्तिक स्वच्छतेशी संबंधित कचरा

**विशेष कचरा –** ट्यूबलाइट, पेंट कॅन्स, मरक्युरी थर्मामीटर्स, औषधे इत्यादी.

याशिवाय, या बल्क वेस्ट जनरेटर्सना केवळ कचरा गोळा करून महानगरपालिका किंवा स्थानिक प्रशासनाकडे देणे पुरेसे राहणार नाही. त्यांना शक्य तितक्या प्रमाणात ओल्या कचऱ्यावर आपल्या परिसरातच प्रक्रिया करणे आवश्यक असेल.

**डिजिटल पोर्टलवर नोंदणी बंधनकारक**

नवीन नियमांनुसार सर्व बल्क वेस्ट जनरेटर्सना सेंट्रल पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक असेल.

नोंदणी करताना आणि त्यानंतर दरवर्षी पुढील माहिती पोर्टलवर सादर करावी लागेल :

**१. कचरा निर्मितीचे प्रमाण**

सोसायटी किंवा संस्थेत दररोज निर्माण होणारा कचरा – ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष कचरा – याचे प्रमाण.

**२. वर्गीकरणाची स्थिती**

चारही प्रकारांमध्ये कचऱ्याचं स्वतंत्र संकलन होतं का याची माहिती.

**३. ऑन–साईट कचरा प्रक्रिया**

सोसायटीत चालणाऱ्या कम्पोस्टिंग किंवा बायोगॅस युनिट्सची माहिती, त्यांची क्षमता आणि प्रत्यक्ष प्रक्रिया केलेला कचरा.

**(पृष्ठ क्र. १८ वर पहा)**

# महासंघ आपल्यासाठी काय करतो?

१. सर्वसामान्य नागरिकास सहकारी गृहरचना संस्थेच्या नोंदणी बाबत मार्गदर्शन करणे.

२. सहकारी गृहरचना संस्था निर्माण करताना लागणाऱ्या सर्व तऱ्हेच्या पोटनियम प्रती तसेच अन्य साहित्य, फॉर्मस् पुरविणे.

३. सहकारी गृहरचना संस्थांच्या नोंदणीची प्रकरणे तयार करून देणे.

४. सहकारी गृहरचना संस्थांच्या मुख्य प्रवर्तकास पहिली सर्वसाधारण सभा घेणेबाबत तसेच या सभेतील कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करणे.

५. विविध समितींच्या सभा घेणेबाबत आणि त्यातील कार्यवाहीबाबत मार्गदर्शन करणे.

६. सहकारी गृहरचना संस्थांना आवश्यक असणारी रजिस्टर्स, अकाऊंट बुक्स इ. छापील स्वरूपात विक्रीसाठी उपलब्ध करून देणे व ती कशी लिहावयाची, याबाबत मार्गदर्शन करणे.

७. सहकारी गृहरचना संस्थांच्या सर्वसाधारण सभांना, संस्थेने लेखी आमंत्रण दिल्यास, महासंघाचा प्रतिनिधी पाठविणे आणि सभेच्या कार्यवाहीबाबत त्यांना मार्गदर्शन करणे.

८. गृहरचना संस्थांच्या पोटनियमामध्ये काही बदल करावयाचा असल्यास संस्थांना त्याबाबत मार्गदर्शन करणे.

९. महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ अन्वये, सहकारी गृहरचना संस्थांचे संदर्भात वेळोवेळी करण्यात आलेले कायदे, त्यास सुचविण्यात आलेल्या दुरुस्त्या, नवीन शासकीय प्रस्ताव व तरतुदींसंबंधी पुस्तके व पुस्तिका उपलब्ध करून देणे.

१०. गृहरचना संस्थांच्या सर्वसाधारण स्वरूपाच्या तसेच विशिष्ट स्वरूपाच्या विविध समस्यांबाबत मार्गदर्शन करणे. व्यक्तीगत प्रकरणे सोडून.

११. सहकारी गृहरचना चळवळीबाबत वेगवेगळ्या परिषदा, परिसंवाद, चर्चासत्र, प्रशिक्षण इ. आयोजित करून तसेच सहकार चळवळीबाबत व्याख्यानमाला आयोजित करून गृहरचना संस्थांना मार्गदर्शन करणे.

१२. वृत्तपत्र तसेच अन्य प्रसिद्धी माध्यमातून सहकारी गृहरचना चळवळीबाबत येणाऱ्या विविध अडचणींना वाचा फोडून त्याबाबत लोकमत संघटित करणे.

१३. महासंघ **'वास्तुदर्शन'** नावाचे मासिक मुखपत्र प्रसिद्ध करतो. त्यामधून महत्त्वाची परिपत्रके, कायदेशीर सल्ला, महत्त्वाचे न्यायालयीन निवाडे, मार्गदर्शनपर लेख छापले जातात.

१४. संस्थेचा पुर्नविकास व मानीव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेअन्स) याबाबत मार्गदर्शन करणे.

१५. विभागीय कार्यालयांमार्फत त्या त्या विभागातील सहकारी संस्थांना मार्गदर्शन करणे.

१६. **सहकार कायदा 'कलम १५४ब २९' प्रमाणे थकबाकी वसुल करणे.**

**कार्यालयाची वेळ : स. १०:३० ते संध्या. ५:३०**

**टीप : रविवार व सुट्टीचे दिवस सोडून.**

# नियमित पान

**जा**नेवारी २६ च्या वास्तुदर्शनच्या अंकामध्ये मी तुम्हा सर्वांना विनंती केली होती की संकुलातील इमारतींवर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्याची योजना करावी. त्यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होईल. याबाबत केलेल्या कारवाईची माहिती महासंघाकडे पाठवावी. त्यानुसार लुंकड ग्रीन्स सोसायटी, विमाननगर या संस्थेने याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल या अंकात दिलेला आहे. याशिवाय त्या संकूलात जमा होणाऱ्या कचऱ्यापासून खत तयार केले जाते.

मित्रहो, सामाजिक जबाबदारीची जाणीव आपल्या प्रत्येकाला ठेवणे आवश्यक ठरते. जेव्हा एखादी संस्था अशाप्रकारे एखादी सामाजिक जबाबदारी उचलते, तेव्हा त्या कार्यवाहीमुळे त्या संस्थेचा फायदा होत असतोच शिवाय एका मोठ्या समाजाला ती कृती फायदेशीर ठरते.

मध्यंतरी मा. राजेंद्र सिंह पुण्याला येऊन गेले. त्यांनी याबाबत अतिशय कठोर शब्दात नदीच्या पाण्याची अवस्था काय आहे याबद्दल विश्लेषण केले.

आपल्या संकुलातील ड्रेनेजचे पाणी स्वच्छ करून नदीत सोडणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. यासाठी संकूलात सिवेजट्रिमेंट शुद्धीकरणाचा प्लँट आपण बसवला तर ते पाणी शुद्ध होऊन नदीत सोडले जाईल आणि नदी प्रदूषित होण्यापासून वाचेल.

यासाठी आमचे सहकारी संचालक श्री. नरोना यांच्या संकुलामध्ये त्यांनी हा प्रयोग अतिशय यशस्वीरीत्या केला आहे. याबाबत त्यांनी संकूलात केलेली व्यवस्था प्रत्यक्ष पाहायची व्यवस्था असेल तर त्यांच्या संस्थेला आपण निश्चित भेट देऊन पूर्ण माहिती घेऊ शकतो. ज्यांना याबाबत माहिती घ्यायची असेल त्यांनी माझ्याशी संपर्क साधल्यास योग्य वेळ ठरवून आपण सर्व त्यांच्या संकूलाला भेट देऊ.

आपल्याकडून सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे.

धन्यवाद.

**– सुभाष चं. कर्णिक**
उपाध्यक्ष

***

---

**(पृष्ठ क्र. १६ वरून पुढे...)**

**४. कोरड्या कचऱ्यावरची प्रक्रिया**

पुनर्वापरयोग्य कचरा कोणत्या अधिकृत रीसायकलर किंवा प्रक्रिया केंद्राकडे पाठवला जातो याचे तपशील.

**५. प्रक्रियेनंतर उरणारा कचरा**

प्रक्रियेनंतर उरणारा अवशिष्ट कचरा किती प्रमाणात लँडफिल किंवा इतर प्रक्रिया केंद्राकडे पाठवला गेला.

**६. कचरा संकलनसंबंधित माहिती**

कचरा संकलन, वाहतूक आणि प्रक्रिया करणाऱ्या अधिकृत एजन्सी किंवा कंत्राटदारांची माहिती.

**'एक्स्टेन्डेड बल्क वेस्ट जनरेटर रिस्पॉन्सिबिलिटी'**

बल्क वेस्ट जनरेटर्सने शक्य असेल तर ओल्या कचऱ्यावर आपल्या परिसरातच प्रक्रिया करणे आवश्यक आहे. जर जागेवर प्रक्रिया करणे शक्य नसेल, तर त्यांना 'एक्स्टेन्डेड बल्क वेस्ट जनरेटर रिस्पॉन्सिबिलिटी सर्टिफिकेट' घ्यावं लागेल. सेंट्रल पोर्टलवर नोंदणी केल्यानंतर हे सर्टिफिकेट घेता येईल.

या सर्टिफिकेटद्वारे संबंधित सोसायटी किंवा संस्था कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी पूर्ण करत आहेत, हे सिद्ध होईल.

हे प्रमाणपत्र महानगरपालिका, नगरपालिका किंवा ग्रामपंचायत बल्क वेस्ट जनरेटर्सने दिलेल्या माहितीची पडताळणी करून देणार आहेत.

जर एखाद्या ठिकाणी सर्व ओल्या कचऱ्यावर जागेवर प्रक्रिया करणे शक्य नसेल, तर अधिकृत प्रक्रिया यंत्रणेकडे कचरा पाठवण्याची व्यवस्था बल्क वेस्ट जनरेटर्सना करावी लागेल.

**नियमांचा मुख्य उद्देश**

या नियमांच्या अंमलबजावणीमागे काही महत्त्वाचे उद्देश असल्याचं प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्पष्ट केलं आहे.

- कचऱ्याचं त्याच्या स्त्रोतावरच वर्गीकरण सुनिश्चित करणे.
- जास्तीत जास्त कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करून पुनर्वापराला चालना देणे.
- डंपिंग ग्राउंडवर जाणारा कचरा कमी करणे.
- शहरांमधील कचरा व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि जबाबदार बनवणे.

या संदर्भातील डिजिटल पोर्टल अद्याप सुरू होण्याच्या प्रक्रियेत आहे. पोर्टल सुरू झाल्यानंतर देशभरातील बल्क वेस्ट जनरेटर्सना त्यावर नोंदणी करून या नियमांचे पालन करणे बंधनकारक असेल.

**– मानसी देशपांडे**
मार्केटींग एंड कम्यूनिकेशन मॅनेजर,
सोशल लॅब एन्व्हायर्नमेंटल सोल्यूशन्स
भ्रमणभाष : ९९२३५६३६७२

***



MIT WPU तर्फे आयोजित भारतीय छात्र संसद या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना महासंघाचे संचालक श्री. अव्हेलिनो नरोना. दि. २१ फेब्रुवारी २०२६

सातारा जिल्हा महासंघातर्फे आयोजित सह. गृह संस्थांसाठी उपस्थित संस्थांचे प्रतिनिधी तसेच पुणे जिल्हा महासंघाचे अध्यक्ष व संचालक.






सातारा जिल्हा महासंघातर्फे आयोजित सह. गृह संस्थांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना जिल्हा उपनिबंधक सातारा तसेच अन्य मान्यवर. दि. २५ फेब्रुवारी २०२६.



छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट तेरावे वंशज श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले महाराज यांची सातारा येथे महासंघाच्या संचालकांनी भेट दिली. डावीकडून मा. श्री. छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, ॲड. विलास वर्तक, महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, संचालक श्री. अव्हेलिनो नरोना, संचालक समीर रुपदे,सातारा महासंघाचे अध्यक्ष नंदकुमार काटे – दि. २५ फेब्रुवारी २०२६.



मेगापोलिस स्पेलंडर सोसायटीत व्यवस्थापन समिती प्रशिक्षण २८ फेब्रुवारी २०२६ ला संपन्न झाले. व्यवस्थापन समितीचे १५ सदस्य सहभागी झाले होते. प्रशिक्षण महासंघाचे संचालक व कोषाध्यक्ष चारुहास कुलकर्णी यांनी दिले.

**संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे भ्रमणभाष क्रमांक तसेच ई-मेल आय.डी. कृपया महासंघाला कळवावेत.**

''वास्तु-दर्शन'' च्या अंकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी आणि जाहिरातींशी पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ सहमत असेलच असे नाही.

मा. अध्यक्ष / सचिव